# नि.दि.दा.क्र.४६/२०२१ मधील निशाण क्र.५९ वरील आदेश
# (CNRNO.MHSI090003212021)

०१. अर्ज व त्यावरील जबाबाचे अवलोकन केले. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतचा दावा निरंतर ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तूत अर्जान्वये अर्जदार हे दाव्याच्या अनुषंगाने काही दस्त दाखल करु पाहत आहेत. दाव्याचे स्वरुप तसेच दस्तांचे स्वरुप बघता सदर दस्त हे उभय पक्षातील वादाच्या अनुषंगाने असल्याचे दिसून येते. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. करीता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील आदेश पारीत करीत आहे:

## आदेश

०१. नि.क्र.५९ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.02.21 11:40:38 +1000

स्थळ : देवगड ( एस.बी.वाळके)

दिनांक: २०/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.